अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी
योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक-बीसीएस-२०११/ प्र.क्र ३५/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक १४ मार्च,२०११

वाचा : १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-बीसीएच-२००८/
प्र.क्र. ३६/ मावक-२, दिनांक १५ नोव्हेंबर,२००८

२) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-बीसीएच-२००९/
प्र.क्र. १५९/ मावक-२, दिनांक ९ मार्च,२०१०

३) शासन पत्र क्रमांक-बीसीएच-२००९/ प्र.क्र. १५९/ मावक-२, दिनांक ७ मे,२०१०

४) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-बीसीएच-२००९/
प्र.क्र. १५९/ मावक-२, दिनांक ८ ऑगस्ट,२०१०

५) शासन निर्णय,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक-बीसीएच-२००९/
प्र.क्र. १५९/ मावक-२, दिनांक २ डिसेंबर,२०१०

**शासन निर्णय :** सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना सर्वसाधारण अनुक्रमांक १ वरील दि. १५/११/२००८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात अनुक्रमांक २ ते ५ वरील आदेशान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदरहू योजनेच्या अंमलबजावणीकरिता शासन पुढील आदेश देत आहे -

अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गासाठी सुरु करण्यात आलेल्या घरकुल योजनेचे काम ग्रामीण भागामध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत सुरु आहे. या योजनेतंर्गत प्रथम टप्प्यात दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत समाविष्ट असलेल्या व निवारा नसलेल्या (झोपडी /कच्चे घर असलेल्या) अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील कुटूंबास लाभ देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. सदरहू योजनेतंर्गत राज्यातील सर्व जिल्हयांमधील दारिद्र्य रेषेखालील निवारा नसलेल्या (झोपडी व कच्चे घर असलेल्या) कुटूंबांची यादी संपेपर्यंत हा प्रथम टप्पा चालूच राहील त्या अनुषंगाने काही जिल्हयात दारिद्रय रेषेखालील यादीतील पात्र लाभार्थ्यांची यादी संपुष्टात आल्यानंतर जिल्हयांना देण्यात आलेला निधी शिल्लक न ठेवता संबंधित जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेने अथवा संबंधित महानगर पालिका / नगर पालिका यांनी व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी त्याबाबत संचालक, समाज कल्याण, पुणे यांना कळवावे. उक्त माहिती प्राप्त झाल्यानंतर संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांना सद

शिल्लक निधी इतर जिल्हयातील उर्वरित पात्र लाभार्थ्यांसाठी वळता करुन ... करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

२. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गासाठी राबवावयाच्या घरकुल योजनेतील ... सुविधा उपलब्ध करुन देण्याचे आदेश यापूर्वीच देण्यात आलेले आहेत. या सुविधेसाठी ... तरतुदीमधुन निर्धुर चूल ही सुविधाही उपलब्ध करुन देण्यात यावी.

३. महानगर पालिका आणि नगर पालिका क्षेत्रात आयएचएसडीपी (Integrated Housing Development Programme) याबाबत सर्वेक्षण झालेले आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना ... आहेत. तीच यादी ग्रामीण भागातील इंदिरा गांधी आवास योजनेच्या धर्तीवर नागरी भागातही ... ठिकाणी आयएचएसडीपी योजना राबविण्यात आलेली नाही त्या ठिकाणी दारिद्रय रेषेखालील ... समाविष्ट असलेल्या व निवारा नसलेल्या (झोपडी / कच्चे घर असलेल्या) अनुसूचित जाती व नवबौध्द ... वॉर्डनिहाय लाभार्थ्यांची यादी चढत्या संख्येने लावावीत व त्यानंतर कमी लाभार्थी असलेल्या वॉर्डातील ... प्रथम लाभ देण्यात यावा व त्यानंतर चढत्या संख्यने लाभार्थी असलेल्या वॉर्डातील लाभार्थ्यांना लाभ ...

४. एमएमआरडीए क्षेत्राकरिता दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्यास एमएमआरडीए यंत्रणेस शक्य दिसत ... विचारात घेवून या क्षेत्रासाठी देण्यात आलेले उद्दिष्ट संबंधित महानगर पालिकांकडे वर्ग करण्यात यावेत ... आवश्यक तो निधी संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांनी उपलब्ध करुन द्यावा.

५. या योजनेतंर्गत ग्रामीण भागातील काम सुरु झालेले आहे. मात्र नगर पालिका, महानगर ... एमएमआरडीओ क्षेत्रात हे काम अद्यापही सुरु झालेले नाही. ही गोष्ट लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी ... उपलब्ध असलेल्या दारिद्रय रेषेखालील कुटूंबांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या व निवारा नसलेल्या (... घर असलेल्या) अनुसूचित जाती व नवबौध्द संवर्गातील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्याचे काम त्वरीत ... नगर पालिका, महानगर पालिका व एमएमआरडीओ क्षेत्रामध्ये घरकुल योजना राबविताना ... अनुदानाच्या धनादेशावर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या स्वाक्षरीची आवश्यकता ... धनादेशावर नगर पालिका क्षेत्रात संबंधित नगर पालिकेचे मुख्याधिकारी व जिल्हा प्रकल्प अधिकारी ... विकास यंत्रणा व नगर परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या स्वाक्षऱ्या तर महानगर पालिका ... संबंधित महानगर पालिकेचे आयुक्त / उपाआयुक्त आणि जिल्हा प्रकल्प अधिकारी, जिल्हा नागरी विकास ... परिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या स्वाक्षरीने लाभार्थ्यांना धनादेश ... यावे.लाभार्थ्यांना एकूण तीन टप्प्यामध्ये रक्कम अदा करण्यात यावी. मात्र शेवटचा धनादेश ...

घराच्या बांधकामाच्या पूर्णतेचा दाखला (Completion Certificate) प्राप्त झाल्यानंतरच शेवटचा हप्ता देण्यात यावा.

६. हा शासन निर्णय ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत असून सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०३१४१५३३२८१०१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दिनेश वाघमारे)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपाल यांचे कार्यालय
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री , सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव (वित्त),/प्रधान सचिव (नगर विकास विभाग), /प्रधान सचिव (ग्रामविकास)/सचिव (गृहनिर्माण) मंत्रालय मुंबई-३२ यांचे स्वीय सहाय्यक
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
आयुक्त सर्व महानगर पालिका
महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रादेशिक क्षेत्रविकास प्राधिकारण, बांद्रा -कुर्ला संकुल, मुंबई
संचालक, नगर पालिका प्रशासन, वरळी, मुंबई
उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,बांद्रा-कुर्ला संकुल, मुंबई
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व प्रकल्प संचालक,जिल्हाग्रामीण विकास यंत्रणा
मुख्याधिकारी सर्व नगर पालिका / नगर परिषद
वित्त विभाग (व्यय-१४/ अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई
सर्व जिल्हा कोषागर अधिकारी
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
सर्व मंत्रालयीन विभाग
महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर
कक्ष अधिकारी, विधान मंडळ अनुसूचित जाती कल्याण समिती (डी-४),५वा मजला,विधानभवन, मुंबई-३२ (५ प्रतीसह)
निवड नस्ती, मावक-२

H 3132 - 2.